रजिस्ट्री सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2] | नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 | [खण्ड 5 |
| No. 2] | NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 | [Vol. 5 |
| अंक २] | नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ | [खंड ५ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसेबिलिटीज रिमूवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अँन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# शासकीय गुपिते अधिनियम, १९२३

## (सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १९)[1]

(१५ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान) [२ एप्रिल, १९२३]

**शासकीय गुपितांशी संबंधित असलेला [2]* * * कायदा एकत्रित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

[3]* * * *

ज्याअर्थी, [2]* * * शासकीय गुपितांशी संबंधित असलेला कायदा एकत्रित व विशोधित करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

[4][ १. (१) या अधिनियमास, शासकीय गुपिते अधिनियम, १९२३, असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रयुक्ती.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे व तो भारताबाहेर असलेले शासनाचे सेवक व भारतीय नागरिक यांनाही लागू आहे.]

२. विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमामध्ये,— व्याख्या.

(१) शासनाच्या मालकीच्या जागेच्या कोणत्याही निर्देशात, शासनाच्या कोणत्याही विभागाच्या ताब्यात असलेल्या जागेचा अंतर्भाव आहे—मग अशी जागा शासनाकडे प्रत्यक्षात निहित झालेली असो वा नसो ;

[5]* * * *

(२) संसूचित करणे किंवा ग्रहण करणे या क्रियांचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगांत, कोणतीही गोष्ट संसूचित करण्याच्या किंवा ग्रहण करण्याच्या क्रियेचा समावेश आहे—मग अशी गोष्ट संपूर्णतः संसूचित किंवा ग्रहण केलेली असो किंवा अंशतः संसूचित किंवा ग्रहण केलेली असो, आणि प्रत्यक्ष रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती संसूचित किंवा ग्रहण केलेली असो अथवा त्यांचा केवळ आशय, तात्पर्य किंवा वर्णन संसूचित किंवा ग्रहण केलेले असो; कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज मिळविणे किंवा ठेवून घेणे याचा निर्देश करणाऱ्या शब्दप्रयोगांत, कोणतेही संपूर्ण रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज, अथवा त्यांचा कोणताही भाग याची नक्कल करणे किंवा नक्कल करवणे याचा समावेश आहे; आणि कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज संसूचित करण्याचा निदेश करणाऱ्या शब्दप्रयोगांत, असे रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज हस्तांतरित किंवा रवाना करणे याचा समावेश आहे;

(३) "दस्तऐवज" यात, दस्तऐवजाच्या भागाचा समावेश आहे;

(४) "नमुनाकृति" यात, संकल्पचित्र, आकृतिबंध व नमुना यांचा समावेश आहे;

(५) "युद्धसामग्री" यात, युद्धामध्ये उपयोग करण्यासाठी योजलेले किंवा युद्धामध्ये उपयोग करण्यासाठी अनुकूल करून घेतलेले कोणतेही संपूर्ण जहाज, पाणबुडी, विमान, रणगाडा किंवा तत्सम इंजिन, शस्त्रे व दारूगोळा, पाणतीर किंवा सुरुंग किंवा त्याचा कोणताही भाग, आणि अशा कामासाठी उपयोगी पडावी या उद्देशाने प्रत्यक्षात तयार केलेली किंवा सुचवलेली इतर कोणतीही वस्तू, सामग्री किंवा साधन यांचा समावेश आहे;

(६) "शासनाच्या अखत्याराखालील पद" यामध्ये, शासनाच्या [6]* * कोणत्याही विभागातील किंवा त्याच्या अखत्याराखालील कोणतेही पद किंवा नोकरी याचा समावेश आहे;

---

१. हा अधिनियम पुढील ठिकाणी विस्तारित करण्यात आला आहे :—१९६२ चा विनियम १२, कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे गोवा, दमण व दीव यांवर; १९६३ चा विनियम ६, कलम २ आणि अनुसूची १ यांद्वारे दादरा व नगर हवेलीवर; १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची १ यांद्वारे पाँडिचेरीवर; आणि १९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची यांद्वारे लखदीव, मिनिकॉय व अमिनदीवी बेटांवर.

२. अनुकूलन आदेश, १९५०, द्वारे "प्रांतामधील" हे शब्द गाळले.

३. वरील आदेशाद्वारे प्रास्ताविकेचे पहिले दोन परिच्छेद गाळले.

४. १९६७ चा अधिनियम २४, कलम २ द्वारे अगोदरच्या कलमाऐवजी घातले.

५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातलेला खंड (१क) अनुकूलन आदेश, १९४८, द्वारे निरसित केला.

६. १९६७ चा अधिनियम २४, कलम ३ द्वारे "किंवा युनायटेड किंग्डमच्या शासनाच्या किंवा ब्रिटिश कब्जातील कोणत्याही प्रदेशांच्या शासनाच्या" हा मजकूर गाळला.

(७) "छायाचित्र" यामध्ये न धुतलेली फिल्म किंवा प्लेट याचा समावेश आहे;

(८) "प्रतिषिद्ध जागा" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(क) शासनाच्या मालकीचे किंवा शासनाच्या ताब्यात असलेले अथवा शासनाच्या तर्फे ताब्यात असलेले कोणतेही संरक्षण बांधकाम, दारूगोळा कारखाना, नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी आस्थापना किंवा ठाणे, सुरुंग, सुरुंगक्षेत्र, छावणी, जहाज किंवा विमान, याप्रमाणे शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही लष्करी तारायंत्र किंवा दूरध्वनियंत्रणा, याप्रमाणे शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही बिनतारी केंद्र किंवा संकेतन केंद्र किंवा कार्यालय आणि याप्रमाणे शासनाच्या मालकीचा किंवा त्याच्या ताब्यात असलेला असा आणि कोणतीही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही रेखाटने, आराखडे, नमुनाकृती किंवा दस्तऐवज (प्रकरणपरत्वे), बांधण्याच्या, दुरुस्त करण्याच्या, तयार करण्याच्या किंवा साठविण्याच्या प्रयोजनासाठी किंवा युद्धाच्या वेळी वापरण्यासाठी कोणतेही धातू, तेल किंवा खनिजद्रव्ये मिळवण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारा कोणताही कारखाना, गोदीक्षेत्र, किंवा इतर जागा;

(ख) शासनाशी किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीशी, किंवा अन्यथा शासनाच्या वतीने केलेल्या करारान्वये ज्या जागेत कोणतीही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित असलेली कोणतीही रेखाटने, नमुनाकृती, आराखडे किंवा दस्तऐवज तयार करण्यात येतात, त्यात दुरुस्ती करण्यात येते, ते मिळवण्यात येतात किंवा साठवण्यात येतात अशी शासनाच्या मालकीची नसलेली कोणतीही जागा;

(ग) जी जागा, तिच्या संबंधातील माहिती किंवा त्या जागेला होणारी हानी शत्रूला उपयुक्त ठरेल या कारणावरून केंद्र शासनाने, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी प्रतिषिद्ध जागा म्हणून त्या त्या वेळी घोषित केली असेल व जेथे तिच्या संबंधातील अधिसूचनेची इंग्रजीमधील व तेथील स्थानिक भाषेतील एक प्रत लावण्यात आलेली असेल अशी शासनाच्या मालकीची किंवा शासनाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी कोणतीही जागा;

(घ) जी कोणतीही रेल्वे, सडक, मार्ग किंवा जलमार्ग अगर जमिनीवरील किंवा पाण्यावरील दळणवळणाचे इतर साधन (त्याचा भाग असलेली किंवा त्याच्याशी निगडीत असलेली कोणतीही बांधकामे किंवा संरचना यांसुद्धा), अथवा गॅस, पाणी किंवा वीज यासंबंधीची बांधकामे किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी असलेली इतर बांधकामे यासाठी वापरण्यात येणारी जी कोणतीही जागा, अथवा शासनाच्या वतीने नव्हे तर अन्यथा जेथे कोणतीही युद्धसामग्री किंवा तिच्याशी संबंधित अशी कोणतीही रेखाटने, नमुनाकृती, आराखडे किंवा दस्तऐवज तयार करण्यात, दुरुस्त करण्यात किंवा साठवण्यात येत आहेत अशी जी कोणतीही जागा, तिच्या संबंधातील माहिती, किंवा तिचा विनाश अथवा तिला अडथळा किंवा तिच्यामध्ये केलेला हस्तक्षेप शत्रूला उपयुक्त ठरेल या कारणावरून केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी प्रतिषिद्ध जागा म्हणून त्या त्या वेळी घोषित केले असेल व जेथे तिच्या संबंधातील त्या अधिसूचनेची इंग्रजीमधील व तेथील स्थानिक भाषेतील प्रत लावण्यात आलेली असेल ती रेल्वे, सडक, मार्ग किंवा जलमार्ग किंवा ते दळणवळणाचे साधन किंवा ती जागा;

(९) "रेखाटन" यामध्ये, कोणतेही छायाचित्र अथवा एखाद्या जागेचे किंवा वस्तूचे प्रतिरूपण करण्याची अन्य पद्धती यांचा समावेश आहे; आणि

[1]* * * * *

(१०) "पोलीस अधीक्षक" यामध्ये तत्सम किंवा त्याहून वरिष्ठ दर्जाचा कोणताही पोलीस अधिकारी, आणि केंद्र शासनाने [2]* * या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पोलीस अधीक्षकाच्या शक्ती ज्या व्यक्तीला प्रदान केल्या आहेत अशी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश आहे.

**हेरगिरीबद्दल शिक्षा.** ३. (१) जेव्हा कोणतीही व्यक्ती देशाची सुरक्षितता किंवा हित यास बाधक ठरणाऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी,—

(क) कोणत्याही प्रतिषिद्ध जागेजवळ जाईल, तिची पाहणी करील, तिच्या जवळून जाईल किंवा तिच्या आसपास फिरकेल किंवा त्या जागेत प्रवेश करील तेव्हा; किंवा

(ख) शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगे किंवा पडू शकेल असे किंवा पडावे म्हणून योजिलेले असे कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती किंवा टिप्पणी तयार करील तेव्हा; किंवा

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे घातलेला खंड (९क) १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे निरसित केला.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "किंवा कोणत्याही स्थानिक शासनाने" हा मजकूर गाळला.

(ग) कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द अथवा शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगे किंवा पडू शकेल असे किंवा पडावे म्हणून योजलेले असे [1][किंवा जी बाब उघड केल्यामुळे भारताची सार्वभौमता व एकात्मता, देशाची सुरक्षितता व विदेशी राज्यांशी असलेले मित्रत्वाचे संबंध यांच्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे अशा बाबींशी जे संबंधित आहे. असे] कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू किंवा टिप्पणी किंवा इतर दस्तऐवज किंवा माहिती मिळवील, गोळा करील, नमूद करील किंवा प्रसिद्ध करील किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला संसूचित करील तेव्हा,

ती व्यक्ती, तिचा अपराध हा, कोणतेही संरक्षण बांधकाम, दारुगोळा कारखाना, नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी आस्थापना किंवा ठाणे, सुरुंग, सुरुंगक्षेत्र, कारखाना, गोदीक्षेत्र, छावणी, जहाज किंवा विमान यांच्या संबंधातील किंवा अन्यथा शासनाच्या नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी कारभाराच्या संबंधातील किंवा कोणत्याही गुप्त शासकीय संकेतलिपीच्या संबंधातील अपराध असेल त्या बाबतीत, चौदा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या व इतर प्रकरणांत तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास पात्र होईल.

(२) या कलमाखाली [2]*      *      *      *      शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल खटला भरण्यात आला असता, आरोपी व्यक्ती ही, देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास जो बाधक ठरेल असा हेतू दिसून येण्यासारखे कोणतेही विशिष्ट कृत्य केल्याबद्दल दोषी होती हे दाखवण्याची आवश्यकता असणार नाही, आणि, असे कोणतेही कृत्य तिच्या विरुद्ध सिद्ध झाले नाही तरीसुद्धा, जर प्रकरणाच्या परिस्थितीवरून किंवा तिच्या वर्तनावरून किंवा सिद्ध झालेल्या तिच्या ज्ञात चारित्र्यावरून तिचा हेतू हा देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक होता असे दिसून येत असेल तर, ती व्यक्ती दोषी ठरवली जाऊ शकेल; आणि जर कोणत्याही प्रतिषिद्ध जागेसंबंधीचे किंवा अशा जागेमध्ये वापरण्यात येणारे किंवा अशा जागेमधील कोणत्याही गोष्टीसंबंधीचे कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती किंवा कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द हा कायदेशीर प्राधिकारान्वये कार्य करणाऱ्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीने तयार केला असेल, मिळवला असेल, गोळा केला असेल, नमूद केला असेल, प्रसिद्ध केला असेल किंवा संसूचित केला असेल, आणि तिचा हेतू देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक होता हे प्रकरणाच्या परिस्थितीवरून किंवा तिच्या वर्तनावरून किंवा सिद्ध झालेल्या तिच्या ज्ञात चारित्र्यावरून दिसून येत असेल तर, असे रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज, [3][माहिती, संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द हे] देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक अशा प्रयोजनासाठी तयार करण्यात, मिळवण्यात, गोळा करण्यात, नमूद करण्यात, प्रसिद्ध करण्यात किंवा संसूचित करण्यात आलेले असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

**परकीय हस्तकांबरोबर केलेला संपर्कव्यवहार हा विवक्षित अपराध केल्याचा पुरावा असणे.**

४. (१) कलम ३ खालील अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीविरुद्ध केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत त्या व्यक्तीचा परकीय हस्तकाशी—मग तो [4][भारतात असो किंवा भारताबाहेर] असो—संपर्कव्यवहार चालू आहे किंवा तिने संपर्कव्यवहार चालू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे ही गोष्ट देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक अशा प्रयोजनासाठी त्या व्यक्तीने शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयोगी पडण्याजोगी किंवा पडू शकेल अशी किंवा पडावी म्हणून योजलेली माहिती मिळविलेली आहे किंवा मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे हे सिद्ध करण्याच्या दृष्टीने संबद्ध ठरेल.

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, परंतु पूर्वगामी उपबंधाच्या व्यापकतेला बाधा न येता,—

(क) (एक) जर एखादी व्यक्ती [5][भारताच्या] आत किंवा बाहेर एखाद्या परकीय हस्तकाच्या पत्त्यावर त्याला भेटली असेल किंवा तिने परकीय हस्तकाबरोबर साहचर्य किंवा सहयोग केला असेल तर, किंवा

(दोन) [5][भारताच्या] आत किंवा बाहेर, एखाद्या परकीय हस्तकाचे नाव किंवा पत्ता किंवा त्याच्याबद्दलची इतर कोणतीही माहिती त्या व्यक्तीकडे मिळाली असेल किंवा तिने अन्य कोणत्याही व्यक्तीकडून मिळवली असेल तर,

अशा व्यक्तीने एखाद्या परकीय हस्तकाशी संपर्कव्यवहार चालू ठेवला असल्याचे गृहीत धरता येईल;

(ख) "परकीय हस्तक" या शब्दप्रयोगात, जी कोणतीही व्यक्ती देशाच्या सुरक्षिततेस किंवा हितास बाधक असे कृत्य [5][भारताच्या] आत किंवा बाहेर करण्याच्या प्रयोजनासाठी एखाद्या

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ४ द्वारे घातले.
२. १९६७ चा अधिनियम २४, कलम ४ द्वारे "चौदा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या" हा मजकूर गाळला.
३. १९६७ चा अधिनियम २४, कलम ४ द्वारे, "किंवा माहिती" याऐवजी घातले.
४. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "देश" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
५. किता—कलम ३ व अनुसूचीद्वारे "देश" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

परकीय सत्तेने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे नियुक्त केलेली असेल किंवा नियुक्त केलेली होती किंवा ती अशाप्रकारे नियुक्त केलेली आहे किंवा होती असा संशय घेण्यास रास्त कारणे आहेत असे दिसते अथवा जिने परकीय सत्तेच्या हितासाठी [1][भारताच्या] आत किंवा बाहेर असे कृत्य केलेले असावे किंवा ते करण्याचा प्रयत्न केलेला असावा असा जिच्या संबंधात रास्त संशय असेल अशी कोणतीही व्यक्ती समाविष्ट आहे;

(ग) [1][भारताच्या] आतील किंवा बाहेरील जे ठिकाण परकीय हस्तकासाठी अभिप्रेत असलेले संदेश ग्रहण करण्यासाठी वापरले जात असावे असा संशय घेण्यास रास्त कारणे असल्याचे दिसून-येते, त्या ठिकाणचा असा कोणताही पत्ता, अथवा जेथे परकीय हस्तक राहतो किंवा संदेश देण्या-साठी किंवा ग्रहण करण्यासाठी त्याचा जेथे राबता असतो, किंवा जेथे तो कोणताही कामधंदा करतो असा कोणताही पत्ता हा परकीय हस्तकाचा पत्ता असल्याचे व अशा पत्त्यावर केलेला संपर्क-व्यवहार हा परकीय हस्तकाशी केलेला संपर्कव्यवहार असल्याचे गृहीत धरता येईल.

गैरपणे माहिती कळवणे, इ. *५. (१) एखाद्या व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द अथवा कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती असेल आणि ती प्रतिषिद्ध जागेशी संबंधित असेल किंवा अशा जागेत वापरण्यात येत असेल किंवा अशा जागेतील कोणत्याही गोष्टींशी संबंधित असेल, [2][किंवा शत्रूला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे साहाय्य-भूत होण्याची शक्यता असेल किंवा जी बाब उघड केल्यामुळे भारताची सार्वभौमता व एकात्मता, देशाची सुरक्षितता किंवा विदेशी राज्यांशी असलेले मित्रत्वाचे संबंध यांस बाध येण्याची शक्यता आहे अशा बाबींशी ती संबंधित असेल किंवा या अधिनियमाचे उल्लंघन करून ती तयार करण्यात किंवा मिळवण्यात आलेली असेल] किंवा शासनाच्या अखत्यारातील पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, त्या व्यक्तीकडे जी विश्वासाने सोपवली असेल किंवा शासनाच्या अखत्यारातील पद धारण करणारी किंवा जिने धारण केले होते अशी व्यक्ती म्हणून, किंवा शासनाच्या वतीने केलेले कंत्राट जिने घेतलेले आहे किंवा घेतलेले होते अशी व्यक्ती म्हणून, किंवा असे पद धारण करणाऱ्या किंवा धारण केलेले होते अशा किंवा असे कंत्राट घेणाऱ्या किंवा घेतलेले होते अशा व्यक्तीने नियुक्त केलेली आहे किंवा नियुक्त केलेली होती अशी व्यक्ती म्हणून तिने ती मिळवलेली असेल किंवा ती तिला मिळवता आली असती अशी स्थिती असून ती व्यक्ती जर—

(क) ती संकेतलिपी किंवा तो परवलीचा शब्द, ते रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती ज्या व्यक्तीला कळवण्यास अशा व्यक्तीला प्राधिकृत केले आहे त्या व्यक्तीखेरीज किंवा एखाद्या न्यायालयाखेरीज किंवा देशाच्या हिताच्या दृष्टीने ज्या व्यक्तीला ती कळवणे अशा व्यक्तीचे कर्तव्य आहे, त्या व्यक्तीखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीला जाणूनबुजून कळवील तर; किंवा

(ख) स्वतःच्या ताब्यात असलेल्या माहितीचा कोणत्याही परकीय सत्तेच्या फायद्यासाठी किंवा देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा इतर कोणत्याही पद्धतीने उपयोग करील तर; किंवा

(ग) स्वतःच्या ताब्यातील किंवा नियंत्रणाखालील कोणतेही रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज, तो ठेवून घेण्याचा अधिकार नसतानाही किंवा तो ठेवून घेणे त्याच्या कर्तव्याच्या विरुद्ध असतानाही ठेवून घेईल किंवा तो परत करण्याच्या किंवा त्याची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात कायदेशीर प्राधिकरणाने काढलेल्या सर्व निदेशांचे पालन करण्यास जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(घ) ते रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तु, टिप्पणी, दस्तऐवज, गुप्त शासकीय संकेत-लिपी किंवा परवलीचा शब्द किंवा माहिती यांची वाजवी काळजी घेण्यास चुकेल किंवा त्याच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अशा प्रकारे वागेल तर,

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(२) जर कोणतीही व्यक्ती स्वेच्छेने, कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द किंवा कोणतेही रेखाटन, आराखडा, वस्तू, नमुनाकृती, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती स्वीकारील व ती संकेतलिपी, परवलीचा शब्द, रेखाटन, आराखडा, नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा माहिती स्वीकारते-वेळी या अधिनियमाचे उल्लंघन करून ती पोहोचवण्यात आली आहे हे तिला माहीत असेल किंवा तसे मानण्यास वाजवी कारण असेल तर, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(३) जर एखादी व्यक्ती तिच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले, युद्धसामग्रीच्या संबंधातील कोणतेही रेखाटन, आराखडा, नमूनाकृती, वस्तू, टिप्पणी, दस्तऐवज किंवा माहिती प्रत्यक्षपणे किंवा

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनूसूची यांद्वारे "देश" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. १९६७ चा अधिनियम २४, कलम ५ द्वारे "किंवा या अधिनियमाचे उल्लंघन करून ती तयार करण्यात किंवा मिळवण्यात आलेली असेल" याऐवजी घातले.

* १९७१ चा अधिनियम ४२, कलम ६ द्वारे हे कलम तात्पुरते विशोधित केलेले आहे. पहा—पृष्ठ ११ वरील परिशिष्ट.

अप्रत्यक्षपणे कोणत्याही परकीय सत्तेला किंवा देशाच्या सुरक्षिततेस किंवा हिताला बाधक ठरेल अशा रीतीने पोहोचती करील तर, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

[1][ (४) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती, तीन वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.]

**गणवेशांचा अनधिकृत वापर, खोटे अहवाल तयार करणे, बनावट दस्तऐवज करणे, तोतयेगिरी व खोटे दस्तऐवज.**

६. (१) जर कोणतीही व्यक्ती प्रतिषिद्ध जागेत प्रवेश मिळवण्यासाठी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीस प्रवेश मिळवण्याच्या कामी सहाय्य करण्यासाठी किंवा देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी,—

(क) कायदेशीर प्राधिकाराशिवाय कोणताही नौसैनिकी, सैनिकी, वायुसैनिकी, पोलिसी किंवा इतर शासकीय गणवेष अगर तशी फसगत होण्याइतपत त्या गणवेषासारखा दिसणारा कोणताही गणवेष वापरील किंवा घालील, अथवा असा कोणताही गणवेष वापरण्यास किंवा घालण्यास जी व्यक्ती हक्कदार आहे किंवा होती ती व्यक्ती आपण स्वतः असल्याचे खोटेच भासवील तर; किंवा

(ख) मौखिकरीत्या अथवा कोणतेही अधिकथन किंवा अर्जे यामधील किंवा स्वतः सही केलेल्या किंवा स्वतःच्या वतीने सही करण्यात आलेल्या कोणत्याही दस्तऐवजामधील लेखी मजकुरात, जाणूनबुजून कोणतेही खोटे निवेदन करील किंवा त्यातून कोणताही मजकूर गाळील अथवा तसे केले जात असता त्याकडे बुद्धचा दुर्लक्ष करील तर; किंवा

(ग) कोणताही पासपोर्ट किंवा कोणताही नौसैनिकी, सैनिकी, वायुसैनिकी, पोलिसी किंवा शासकीय पास, परवाना, प्रमाणपत्र, लायसन किंवा तत्सम स्वरूपाचा इतर दस्तऐवज (या कलमात यापुढे "शासकीय दस्तऐवज" म्हणून निर्देशिलेला) बनावट तयार करील, त्यात फेरफार करील, किंवा गैरफेर करील तर, अथवा अशा रीतीने कोणताही बनावट तयार केलेला, फेरफार केलेला किंवा नियमबाह्य शासकीय दस्तऐवज वापरील किंवा आपल्या ताब्यात ठेवील तर; किंवा

(घ) आपण शासनाच्या अखत्याराखालील पद धारण करणारी व्यक्ती किंवा असे पद धारण करणाऱ्या व्यक्तीकडे नोकरीस राहिलेली व्यक्ती आहोत असे म्हणून किंवा ज्या व्यक्तीला शासकीय दस्तऐवज किंवा गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द रीतसर पाठवण्यात किंवा संसूचित करण्यात आलेला आहे ती व्यक्ती आहोत किंवा ती व्यक्ती आपण नव्हे असे म्हणून तोतयेगिरी करील किंवा तसे खोटेच भासवील तर अथवा स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी कोणताही शासकीय दस्तऐवज, गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द मिळवण्याच्या उद्देशाने जाणूनबुजून कोणतेही खोटे निवेदन करील तर; किंवा

(ङ) शासनाच्या कोणत्याही खात्याच्या अथवा शासनाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली नियुक्त केलेल्या कोणत्याही राजदौतिक, नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी प्राधिकरणाचा किंवा त्याच्या मालकीचा किंवा त्याने वापरलेला किंवा बनवलेला किंवा पुरवलेला कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा अथवा तशी फसगत होण्याइतपत असा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा यांच्यासारखा दिसणारा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा वापरील किंवा आपल्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली ठेवील अथवा असा कोणताही साचा, शिक्का किंवा ठसा नकली तयार करील अथवा असा कोणताही नकली साचा, शिक्का किंवा ठसा जाणूनबुजून वापरील किंवा आपल्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली ठेवील तर;

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

(२) जर कोणतीही व्यक्ती, देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी,—

(क) कोणताही शासकीय दस्तऐवज—मग तो पूर्ण केलेला असो किंवा नसो किंवा वापरासाठी दिलेला असो किंवा नसो—तो स्वतःकडे ठेवून घेण्याचा अधिकार नसताना किंवा तसा तो ठेवून घेणे त्याच्या कर्तव्याच्या विरुद्ध असताना स्वतःकडे ठेवून घेईल किंवा शासनाच्या कोणत्याही खात्याने किंवा अशा खात्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, असा दस्तऐवज परत करण्याबाबत किंवा त्याची विल्हेवाट लावण्याबाबत दिलेल्या कोणत्याही निदेशांचे पालन करण्यास जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(ख) केवळ तिच्या स्वतःच्या वापरासाठी दिलेला कोणताही शासकीय दस्तऐवज अन्य कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात राहू देईल, किंवा अशी पाठवलेली कोणतीही गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द संसूचित करील अथवा स्वतःखेरीज अन्य व्यक्तीच्या वापरासाठी

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ५ द्वारे पूर्वीच्या पोटकलम (४) ऐवजी घातले (१० जुलै १९६८ रोजी व तेव्हापासून).

देण्यात आलेला कोणताही शासकीय दस्तऐवज किंवा गुप्त शासकीय संकेतलिपी किंवा परवलीचा शब्द कोणत्याही कायदेशीर प्राधिकाराशिवाय किंवा सबबीशिवाय स्वतःच्या कब्जात बाळगील अथवा कोणताही शासकीय दस्तऐवज सापडल्यामुळे किंवा अन्यथा तो ताब्यात घेतल्यावर, जिने किंवा जिच्या वापराकरिता तो पाठवला होता अशा व्यक्तीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे किंवा पोलीस अधिकाऱ्याकडे परत पाठविण्यास जाणूनबुजून चुकेल तर; किंवा

(ग) पूर्वोक्त असा कोणताही ठावा, शिक्का किंवा ठसा कायदेशीर प्राधिकाराशिवाय किंवा सबबीशिवाय तयार करील किंवा त्याची विक्री करील किंवा तो विक्रीसाठी स्वतःच्या कब्जात बाळगील तर,

ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

(३) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती [१][तीन वर्षे] पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

(४) कलम ३, पोटकलम (२) चे उपबंध हे जसे देशाची सुरक्षितता किंवा हित यांस बाधक ठरेल असे प्रयोजन सिद्ध करण्यासाठी, त्या कलमाखाली [२]* * * शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दलच्या खटल्यांना लागू होतात, तसे ते देशाच्या सुरक्षिततेस बाधक ठरेल असे प्रयोजन सिद्ध करण्यासाठी, शासनाच्या नौसैनिकी, सैनिकी किंवा वायुसैनिकी कारभाराच्या संबंधातील किंवा कोणत्याही गुप्त शासकीय संकेतलिपीच्या संबंधातील या कलमाखालील अपराधाबद्दलच्या कोणत्याही खटल्यास लागू होतील.

**पोलीस अधिकाऱ्यांच्या किंवा संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील व्यक्तींच्या कामात हस्तक्षेप करणे.**

७. (१) कोणत्याही प्रतिषिद्ध जागेच्या जवळपासच्या कोणत्याही व्यक्तीने प्रतिषिद्ध जागेच्या संबंधात रखवालीच्या, सशस्त्र पहाऱ्याच्या किंवा गस्त घालण्याच्या कामी किंवा अन्य तत्सम कामात गुंतलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा [३][संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील] कोणत्याही सदस्याला अटकाव करता कामा नये किंवा त्याची जाणूनबुजून दिशाभूल करता कामा नये किंवा अन्यप्रकारे त्याच्या कामात हस्तक्षेप करता कामा नये किंवा व्यत्यय आणता कामा नये.

(२) एखादी व्यक्ती या कलमाच्या उपबंधांचे उल्लंघन करून त्याविरुद्ध वागली तर, ती [४][तीन वर्षे] पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**अपराध घडल्याबद्दलची माहिती अथवा देण्याचे कर्तव्य.**

८. (१) पोलीस अधीक्षकाच्या, किंवा फौजदाराच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेल्या ज्या अन्य पोलीस अधिकाऱ्याला पोलीस महानिरीक्षकाने किंवा पोलीस आयुक्ताने याबाबतीत शक्ती प्रदान केली असेल त्यास अथवा [३][संघराज्याच्या सशस्त्र सेनेतील] जो सदस्य रखवालीच्या, सशस्त्र पहाऱ्याच्या किंवा गस्त घालण्याच्या किंवा अन्य तत्सम कामात गुंतलेला असेल अशा कोणत्याही सदस्यास, त्याने मागणी केल्यावर, कलम ३ खाली किंवा कलम ९ सहित कलम ३ खाली घडलेल्या अपराधासंबंधी किंवा तसा जो अपराध घडल्याचा संशय असेल अशा अपराधासंबंधी स्वतःच्या शक्तीनुसार शक्य ती माहिती पुरविणे आणि तसे फर्माविण्यात आल्यास व योग्य तो खर्च देऊ करण्यात आल्यास, अशी माहिती पुरवण्याच्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी वेळी व ठिकाणी हजर राहणे हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल.

(२) जर एखादी व्यक्ती पूर्वोक्ताप्रमाणे अशी माहिती पुरवण्यास किंवा हजर राहण्यास चुकली तर ती [४][तीन वर्षे] पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**प्रयत्न, चिथावणी, इत्यादी.**

९. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाखालील अपराध करण्याचा प्रयत्न करील किंवा तसा अपराध करण्यास अपप्रेरणा देईल ती व्यक्ती, जणू काही तिने असा अपराध केलेला असल्याप्रमाणे त्याच-रीतीने त्याच शिक्षेस पात्र ठरेल व तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल.

**हेरांना आसरा दिल्याबद्दल शिक्षा.**

१०. (१) एखादी व्यक्ती कलम ३ खाली किंवा कलम ९ सहित कलम ३ खाली अपराध करण्याच्या बेतात आहे हे किंवा तिने असा अपराध केलेला आहे हे स्वतःला माहीत असताना किंवा तसे समजण्यास वाजवी कारणे असताना अशा व्यक्तीला जाणूनबुजून जर अन्य कोणत्याही व्यक्तीने आसरा दिला अथवा अशा कोणत्याही व्यक्तींना स्वतःच्या वापरातील किंवा स्वतःच्या नियंत्रणाखालील कोणत्याही वास्तुमध्ये भेटण्यास किंवा एकत्र जमण्यास जाणूनबुजून परवानगी दिली तर, ती अन्य व्यक्ती या कलमा-खालील अपराधाबद्दल दोषी होईल.

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ६ द्वारे "दोन वर्षे" याऐवजी घातले.
२. १९६७ चा अधिनियम २४, कलम ६ द्वारे "चौदा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या" हा मजकूर गाळला.
३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टीच्या सेनेतील" याऐवजी घातले.
४. १९६७ चा अधिनियम २४, कलम ७ द्वारे "दोन वर्षे" याऐवजी घातले.

(२) ज्या ज्या व्यक्तीने उपरोक्त अशा कोणत्याही व्यक्तीस आसरा दिलेला असेल, किंवा उपरोक्त अशा कोणत्याही व्यक्तींना, स्वतःच्या वापरातील किंवा स्वतःच्या नियंत्रणाखालील कोणत्याही वास्तुमध्ये भेटण्यास किंवा एकत्र जमण्यास परवानगी दिलेली असेल अशा प्रत्येक व्यक्तीने, पोलीस अधीक्षकास किंवा फौजदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या ज्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला पोलीस महानिरीक्षकाने किंवा पोलीस आयुक्ताने याबाबत शक्ती प्रदान केली असेल त्यास, त्याने मागणी केल्यावर अशा कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या संबंधी आपल्या शक्तीनुसार शक्य ती माहिती देणे हे त्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल आणि अशी कोणतीही माहिती देण्यास कोणतीही व्यक्ती चुकल्यास, ती व्यक्ती या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी होईल.

(३) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती [1][तीन वर्षेपर्यंत] असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**झडतीची वॉरंटे.**

**११.** (१) जर शपथेवर देण्यात आलेल्या माहितीवरून इलाखा शहर दंडाधिकारी, प्रथम वर्ग दंडाधिकारी किंवा उपविभागीय दंडाधिकारी याची, या अधिनियमाखाली अपराध करण्यात आलेला आहे, किंवा अपराध घडण्याच्या बेतात आहे असा संशय घेण्यास वाजवी कारण आहे अशी खात्री पटली तर तो झडतीचे वॉरंट देऊन, अशा वॉरंटात पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला जो पोलीस अधिकारी नामनिर्दिष्ट केला असेल त्याला, कोणत्याही वेळी वॉरंटात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वास्तुमध्ये किंवा जागेमध्ये आवश्यक तर, बळजबरीने प्रवेश करण्यास, आणि त्या वास्तुची किंवा जागेची व तेथे आढळून आलेल्या प्रत्येक व्यक्तीची झडती घेण्यास, आणि या अधिनियमाखाली अपराध घडलेला आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे याचा पुरावा असलेले जे काही त्या वास्तुमध्ये किंवा त्या जागी किंवा त्या व्यक्तीकडे त्याला सापडेल व ज्याच्याविषयी किंवा ज्याच्या संबंधात या अधिनियमाखालील अपराध घडलेला आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे असा संशय घेण्यास त्याला वाजवी कारण असेल असे कोणतेही रेखाटन, आराखडा नमुनाकृती, वस्तू, टिप्पणी किंवा दस्तऐवज किंवा तत्सम स्वरूपाची कोणतीही गोष्ट सक्तीने ताब्यात घेण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) पोलीस अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास जेव्हा, एखादे प्रकरण अत्यंत निकडीचे असून देशाच्या हिताच्या दृष्टीने तात्काळ कारवाई करणे आवश्यक आहे असे वाटेल तेव्हा, त्या बाबतीत तो दंडाधिकाऱ्याच्या या कलमाखालील वॉरंटाद्वारे जशा प्रकारचा प्राधिकार देता येतो तसाच प्राधिकार आपल्या सहीच्या लेखी आदेशाद्वारे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास देऊ शकेल.

(३) पोटकलम (२) खाली पोलीस अधिकाऱ्याने कारवाई केलेली असेल त्याबाबतीत, तो शक्य तितक्या लवकर, अशा कारवाईचा वृत्तांत इलाखा शहरामध्ये मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास व अशा शहराबाहेर जिल्हा किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यास कळवील.

**१८९८ चा अधिनियम ५—कलम ३३७ चे उपबंध हे कलमे ३, ५ व ७ यांखालील अपराधांना लागू असणे.**

[2][**१२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८-कलम ३३७ याचे उपबंध हे जसे सात वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाच्या संबंधात लागू होतात तसे ते कलम ३ खाली किंवा कलम ५ खाली किंवा कलम ७ खाली अथवा कलम ९ सहित उक्त कलम ३, ५ किंवा ७ यांपैकी कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या अपराधाच्या संबंधात लागू होतील. ]

**अपराधांच्या संपरीक्षेवर निर्बंध.**

**१३.** (१) ([3][समुचित शासनाने] याबाबत खासकरून शक्ती प्रदान केलेला प्रथम वर्ग दंडाधिकारी सोडून अन्य असे) जे कोणतेही न्यायालय जिल्हा किंवा इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असेल ते या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल दंडाधिकाऱ्यापुढे संपरीक्षाधीन असलेल्या कोणत्याही व्यक्तीने दोषारोपपत्र तयार केले जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, जर सत्र न्यायालयानेच आपली संपरीक्षा करावयास हवी असा दावा सांगितला तर, अशा बाबतीत दंडाधिकारी, त्याने आरोपीला विनादोषारोप सोडून दिले नसल्यास, ते प्रकरण त्या न्यायालयाकडे संपरीक्षेसाठी पाठवील—मग ते प्रकरण फक्त त्याच न्यायालयाने संपरीक्षा करण्याजोगे असे नसले तरी हरकत नाही.

(३) कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबाबत, [4][समुचित शासनाच्या] [5]* * * किंवा [3][समुचित शासनाने] याबाबत शक्ती प्रदान केलेल्या एखाद्या अधिकाऱ्याच्या आदेशावरून किंवा त्याने दिलेल्या प्राधिकारान्वये तक्रार करण्यात आलेली असल्याखेरीज त्या अपराधाची दखल घेणार नाही ;

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ९ द्वारे "एक वर्ष" याऐवजी घातले.
२. १९६७ चा अधिनियम २४, कलम १० द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.
३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे 'स्थानिक शासन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.
४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन-कौन्सिलच्या" याऐवजी घातले.
५. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक शासनाच्या" हे शब्द गाळले.

[1]* * * * *

(४) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीची संपरीक्षा करण्याच्या प्रयोजनांसाठी, अपराध एकतर तो ज्या ठिकाणी प्रत्यक्षात झालेला होता त्या ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी अपराधी सापडेल अशा [2][भारतामधील] कोणत्याही ठिकाणी घडलेला आहे असे मानता येईल ;

[3][ (५) या कलमात, "समुचित शासन" याचा अर्थ,—

(क्) कलम ५ खालील जे अपराध प्रतिषिद्ध जागेशी किंवा परकीय सत्तेशी निगडित नाहीत अशा कोणत्याहीं अपराधाच्या संबंधात, राज्य शासन असा आहे ; व

(ख्) इतर कोणत्याही अपराधांच्या संबंधात केंद्र शासन असा आहे. ]

कामकाजाच्या वेळी लोकांना मज्जाव करणे. १४. या अधिनियमाखालील अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध न्यायालयासमोर कार्यवाही चालू असताना किंवा अपिलावर कार्यवाही चालू असताना, किंवा या अधिनियमाखाली एखाद्या व्यक्तीची संपरीक्षा चालू असताना जर, कार्यवाहीच्या ओघात द्यावयाच्या कोणताही साक्षीपुरावा किंवा त्यावेळी करावयाचे कोणतेही निवेदन याच्या प्रसिद्धीमुळे देशाच्या सुरक्षिततेला बाध येण्याचा संभव आहे, या कारणावरून न्यायालयात सुनावणी चालू असतेवेळी सर्व लोकांना किंवा त्यांपैकी एखाद्या वर्गाला मज्जाव केला जावा असा फिर्यादीपक्षाने अर्ज केला तर, कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी लोकांना मज्जाव करण्याचे आदेश देण्याच्या ज्या शक्ती न्यायालयास असतील त्यांच्याव्यतिरिक्त व त्यास बाध न येता, न्यायालयास तशा आशयाचा आदेश काढता येईल, परंतु कोणत्याही परिस्थितीत शिक्षादेश मात्र लोकांसमक्ष देण्यात येईल.

कंपन्यांनी केलेले अपराध. [4][ १५. (१) या अधिनियमाखालील अपराध करणारी व्यक्ती जर एखादी कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल कंपनीची हुकूमतदार असलेली व त्याबद्दल कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे खुद्द कंपनी ही अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तदनुसार त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास ते पात्र ठरतील :

परंतु, असा अपराध आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमामध्ये उपबंधित केलेल्या अशा कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकानुमतीने असा अपराध घडलेला आहे किंवा त्याने केलेल्या हलगर्जीपणाशी त्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, कंपनीचा असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल व तदनुसार त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क्) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगम-निकाय असा आहे. यात पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा समावेश आहे ; व

(ख्) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीचा भागीदार असा आहे.]

१६. [निरसने.] निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२)—कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. १९६७ चा अधिनियम २४, कलम ११ द्वारे परंतुक गाळले.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे 'देश' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातले.

४. १९६७ चा अधिनियम २४, कलम १२ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी घातले.

रजिस्ट्री. सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
**EXTRAORDINARY**
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
**Part XII Section 1**
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
**PUBLISHED BY AUTHORITY**
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2] | नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 | [खण्ड 5 |
| No. 2] | NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 | [Vol. 5 |
| अंक २] | नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ | [खंड ५ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय
### (विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसॅबिलिटीज रिमूवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन ॲन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE
### (LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# जातिमूलक निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५०[1]

## (सन १८५० चा अधिनियम क्रमांक २१)

[ दिनांक २८ फेब्रुवारी, १९९३ रोजी यथाविद्यमान ]

[ ११ एप्रिल, १८५० ]

**बंगाल संहितेतील १८३२ चा विनिमय सात याचा कलम ९ चे तत्त्व संपूर्ण [2][भारतभर] लागू करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, [3][बंगाल संहितेतील] सन १८३२ चा विनियम सात (१८३२ चा बंगाल विनियम क्रमांक सात) याच्या कलम ९ द्वारे असे अधिनियमित केले आहे की, "जेव्हा कोणत्याही दिवाणी दाव्यात, त्यातील, पक्षकार हे निरनिराळ्या धममतांचे असून, जेव्हा एक पक्षकार हिंदू व दुसरा पक्षकार मुसलमान धर्ममतांचे किंवा हिंदू धर्ममतांचेही नसतील तेव्हा, त्या धर्मांचे कायदे अशा पक्षकारास किंवा पक्षकारांना लागू केले नसते तर, त्यांचा ज्या कोणत्याही संपत्तीवर हक्क राहिला असता त्या संपत्तीनुसार ते

---

१. भारतीय संक्षिप्त नावे अधिनियम, १८९७ (१८९७ चा १४) याद्वारे देण्यात आलेले संक्षिप्त नाव.

हा अधिनियम वऱ्हाडचा कायदेविषयक अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाड प्रांताला लागू करण्यात आला असून कायद्यांचा स्थानिक विस्तार अधिनियम, १८७४ (१८७४ चा १५) च्या कलम ३ द्वारे, अनुसूचित जिल्हे वगळता, तो सर्व प्रांतामध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तो, संथाळ परगणे वसाहत विनियम, १८७२ (१८७२ चा ३) याच्या कलम ३ द्वारे संथाळ परगण्यांमध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

तो, अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ (१८७४ चा १४) याच्या कलम ३ (क) खालील अधिसूचनेद्वारे पुढील अनुसूचित जिल्ह्यांमध्ये अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे :—

| | |
|---|---|
| पश्चिम जलपायगुडी .. | .. **भारताचे राजपत्र**, १८८१, भाग एक, पृष्ठ ७४ पहा. |
| हजारीबागचे जिल्हे, लोहारडागा (आताचा रांची) जिल्हा (**कलकत्ता राजपत्र**, १८९९, भाग एक, पृष्ठ ४४ पहा) आणि मानभूम आणि परगणा. | |
| धालभूम आणि सिंगभूम जिल्ह्यातील कोलहण | .. **भारताचे राजपत्र**, १८८१, भाग एक, पृष्ठ ५०४. |
| मिरझापूर जिल्ह्याचा अनुसूचित भाग | .. **भारताचे राजपत्र**, १८७९, भाग एक, पृष्ठ ३८३. |
| जोनसर बकर .. .. | .. वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ३८२. |
| जिल्हा लाहोल .. .. | .. वरीलप्रमाणे १८८६, भाग एक, पृष्ठ २०१. |
| मध्यप्रांताचे अनुसूचित जिल्हे | .. वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ७७१. |
| गंजम आणि विजागापट्टणम् मधील अनुसूचित जिल्हे .. .. | .. वरीलप्रमाणे १८९८, भाग एक, पृष्ठ ८७०. |
| कूर्ग .. .. | .. वरीलप्रमाणे १८७९, भाग एक, पृष्ठ ७४७. |
| आसाम (उत्तर लुशाई टेकड्या वगळता) | .. **भारताचे राजपत्र**, १८९७, भाग एक, पृष्ठ २९९. |
| सिंघभूम जिल्ह्यातील पुराहत वसाहत | .. **भारताचे राजपत्र**, १८९७, भाग एक, पृष्ठ १०५९. |

तो, शेवटी उल्लेख केलेल्या अधिनियमाच्या कलम ५ खालील अधिसूचनेद्वारे तो पुढील अनुसूचित जिल्ह्यांना लागू करण्यात आला आहे :—

| | |
|---|---|
| कुमाअन आणि गढवाल .. | .. **भारताचे राजपत्र**, १८७६ भाग एक, पृष्ठ ६०६. |
| आग्रा प्रांताचे तराई क्षेत्र | .. वरीलप्रमाणे १८७६, भाग एक, पृष्ठ ५०५. |

तो, नवीन प्रांत व विलीन राज्य यांनाही लागू करण्यात आला आहे. पहा-१९४९ चा अधिनियम, ५९.

२. १९५१ चा अधिनियम, ३ याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या अधीन असलेल्या प्रदेशास" या मजकुराऐवजी घातले.

३. बंगाल, वायव्य प्रांत आणि आसाम दिवाणी न्यायालये अधिनियम, १८८७ (१८८७ चा १२) याद्वारे निरसित झालेला बंगाल दिवाणी न्यायालये अधिनियम, १८७१ (१८७१ चा ६) याद्वारे निरसित.

वंचित होतील अशा रीतीने त्या धर्मांचे कायदे त्या पक्षकाराना लागू करण्यात येणार नाहीत" ; आणि ज्याअर्थी, त्या अधिनियमातील तत्त्व संपूर्ण [1][भारत] भर लागू करणे हिताचे ठरेल ; त्याअर्थी, त्याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात आले आहे :—

**ज्या कायद्यानुसार किंवा परिपाठानुसार धर्मांतरामुळे किंवा जातिभ्रष्टतेमुळे हक्क गमवावे लागतात किंवा त्यांना बाध येतो त्या कायद्याची किंवा परिपाठाची बजावणी बंद होणे.**

१. [1][भारतात] सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा परिपाठाच्या कोणत्याही भागानुसार कोणत्याही व्यक्तीस, त्याने किंवा तिने कोणताही धर्म सोडून दिल्यामुळे किंवा त्याच्या सांघिक धर्माचरणापासून त्याला किंवा तिला वर्जित करण्यात आल्यामुळे किंवा जातिभ्रष्ट करण्यात आल्यामुळे आपले हक्क किंवा संपत्ती गमवावी लागत असेल, किंवा त्यामुळे अशा व्यक्तींचा कोणताही वारसा-हक्क कोणत्याही प्रकारे कमी होत असल्याचे किंवा त्याला बाध येत असल्याचे मानले जात असेल तर, अशा कायद्याचा किंवा परिपाठाचा तो भाग कायदा म्हणून [2][कोणत्याही न्यायालयात] बजावला जाण्याचे बंद होईल.

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

[3][२. (१) या अधिनियमाला "जातिमूलक निःसमर्थता निवारण अधिनियम, १८५०" असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.]

---

१. १९५१ चा अधिनियम ३ याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया, कंपनी सरकारच्या अधीन असलेल्या प्रदेशास" या मजकुराऐवजी घातले.

२. १९५१ चा अधिनियम, ३ याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे "ईस्ट इंडिया कंपनीच्या न्यायालयात आणि उक्त प्रदेशास रॉयल चार्टरन प्रस्थापित केलेल्या न्यायालयात" या मजकुराऐवजी घातले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे जादा दाखल केले.

रजिस्ट्री. सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2] | नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 | [खण्ड 5 |
| No. 2] | NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 | [Vol. 5 |
| अंक २] | नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ | [खंड ५ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय
(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसॅबिलिटीज रिमूवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अॅन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE
(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# आकडेवारी संग्रहण अधिनियम, १९५३

## (१९५३ चा अधिनियम क्रमांक ३२)

[१ जून १९९३ रोजी यथाविद्यमान]

[१८ सप्टेंबर १९५३]

**उद्योग, व्यापार व वाणिज्य यांसंबंधातील विवक्षित प्रकारांची आकडेवारी गोळा करणे सुकर व्हावे यासाठी अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास 'आकडेवारी संग्रहण अधिनियम, १९५३' असे म्हणता येईल.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून, संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [१] दिनांकास तो अंमलात येईल.

**व्याख्या.** २. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "समुचित शासन" याचा अर्थ,—

(एक) केंद्र शासनाने कलम ३ खाली दिलेल्या निदेशान्वये आकडेवारी गोळा करण्यासंबंधात, ते शासन ; आणि

(दोन) राज्य शासनाने त्या कलमाखाली दिलेल्या निदेशान्वये आकडेवारी गोळा करण्या-संबंधात, ते शासन,

असा आहे ;

(ख) "वाणिज्यिक संस्था" याचा अर्थ, व्यापार किंवा वाणिज्य यात गुंतलेली सार्वजनिक मर्यादित कंपनी किंवा सहकारी संस्था किंवा पेढी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ति-निकाय असा आहे, आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो—

(एक) बँक व्यवसायामध्ये किंवा आयुर्विमा व्यवसायामध्ये गुंतलेली संस्था;

(दोन) वित्तीय निगम;

(तीन) नौपरिवहन आणि नौकानयन यांमध्ये गुंतलेली संस्था;

(चार) भागपत्रे, पुंजरोखे आणि रोखे व जिनसा यांचा व्यवहार करणाऱ्या दलालांच्या धंद्यात गुंतलेली संस्था;

(पाच) जाहिरात संमंत्रकांच्या धंद्यात गुंतलेली संस्था;

(सहा) छोटा लोहमार्ग;

(सात) मार्ग परिवहन सेवेत गुंतलेली संस्था;

(आठ) हवाई परिवहन सेवेत गुंतलेली संस्था;

(नऊ) रबर, चहा, कॉफी किंवा सिंकोना यांचा मळा;

(दहा) अग्रेषण आणि समाशोधन अभिकर्त्यांच्या धंद्यात गुंतलेली संस्था;

(अकरा) केंद्र शासनाच्या मते जी वाणिज्य संस्था असून, त्या शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ती तशी असल्याचे घोषित केले आहे अशी अन्य कोणतीही संस्था ;

पण औद्योगिक संस्थेचा समावेश होत नाही;

(ग) "कारखाना" याचा अर्थ, 'कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) याच्या कलम २—खंड (ड) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कारखाना असा आहे;

(घ) "औद्योगिक संस्था" याचा अर्थ, मालाची निर्मिती करणे, जुळवणी करणे, तो आवेष्टित करणे, त्याचे जतन करणे किंवा त्याचे संस्करण करणे यामध्ये अथवा खाणकामामध्ये अथवा विजेची किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या शक्तीची निर्मिती किंवा वितरण यामध्ये गुंतलेली सार्वजनिक मर्यादित कंपनी किंवा सहकारी संस्था किंवा पेढी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तिनिकाय असा आहे ;

---

१. १० नोव्हेंबर १९५६. पहा : भारत सरकारचे राजपत्र १९५६, असाधारण, भाग एक, विभाग १, पृष्ठ १०२७.

(ङ) "मालक" याचा वाणिज्यिक किंवा औद्योगिक संस्थेच्या संबंधातील अर्थ, संस्थेच्या कारभारावर जिचे अंतिम नियंत्रण असेल अशी व्यक्ती किंवा प्राधिकरण असा आहे, आणि जेथे उक्त कारभार व्यवस्थापकाकडे, व्यवस्थापन-संचालकाकडे किंवा व्यवस्थापन-अभिकर्त्याकडे सोपवण्यात आला असेल तेथे, असा व्यवस्थापक, व्यवस्थापन-संचालक किंवा व्यवस्थापन-अभिकर्ता हा संस्थेचा मालक असल्याचे मानण्यात येईल;

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांनी, किंवा अशा नियमांद्वारे घालून दिलेल्या कोणत्याही नमुन्यात विहित केलेले असा आहे.

आकडेवारी गोळा करणे.

३. समुचित शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पुढीलपैकी कोणत्याही बाबीसंबंधातील आकडेवारी गोळा करावी असा निदेश देऊ शकेल, त्या बाबी अशा :—

(क) कोणत्याही उद्योगासंबंधातील किंवा उद्योगांच्या कोणत्याही वर्गासंबंधातील कोणतीही बाब;

(ख) कोणत्याही वाणिज्यिक किंवा औद्योगिक संस्थेसंबंधातील अथवा वाणिज्यिक किंवा औद्योगिक संस्थांच्या वर्गासंबंधातील, आणि विशेषतः कारखान्यासंबंधातील कोणतीही बाब;

(ग) कामगार कल्याण आणि कामगारांची परिस्थिती यांच्याशी जेथवर संबंधित असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत पुढीलपैकी कोणतीही बाब, त्या बाबी अशा,—

(एक) जिनसांची किंमत;

(दोन) उपस्थिति;

(तीन) निवासव्यवस्था, पाणीपुरवठा आणि सफाई या गोष्टी धरून, राहणीची परिस्थिती;

(चार) कर्जबाजारीपणा;

(पाच) राहत्या घरांचे भाडे;

(सहा) वेतन व इतर कमाई;

(सात) कामगारांकरता ज्यांची तरतूद केलेली आहे असे भविष्य निधी आणि अन्य निधी;

(आठ) कामगारांकरता ज्यांची तरतूद केलेली आहे असे लाभ आणि सुखसोयी;

(नऊ) कामाचे तास;

(दहा) रोजगार व बेकारी;

(अकरा) औद्योगिक व कामगार तंटे;

(बारा) श्रमिक उलाढाल;

(तेरा) व्यवसाय संघ;

आणि तदनंतर या अधिनियमाचे उपबंध त्या आकडेवारीच्या संबंधात लागू होतील :

परंतु,—

(क) संविधानाच्या सातव्या अनुसूचीच्या १ ल्या सूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणत्याही नोंदीखाली येणाऱ्या कोणत्याही बाबीसंबंधातील आकडेवारी गोळा करण्याच्या बाबतीत, या अधिनियमाखाली कोणताही निदेश देण्यास या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट राज्य शासनास प्राधिकृत करते असे मानले जाणार नाही, किंवा

(ख) कोणत्याही बाबीसंबंधातील आकडेवारी गोळा करण्यासाठी या कलमाखाली केंद्र शासनाने कोणताही निदेश दिला असेल त्याबाबतीत, केंद्र शासनाचे आकडेवारी गोळा करण्याचे काम अपूर्ण असेतोवर कोणतेही राज्य शासन, केंद्र शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज कोणताही तत्सम निदेश देणार नाही, किंवा

(ग) कोणत्याही बाबीसंबंधातील आकडेवारी गोळा करण्यासाठी या कलमाखाली राज्य शासनाने कोणताही निदेश दिला असेल त्याबाबतीत, जर दोन किंवा त्याहून अधिक राज्यांच्या संदर्भात आकडेवारी गोळा करावयाची असेल ती प्रकरणे खेरीजकरून इतर प्रकरणी आकडेवारी गोळा करण्याचे काम अपूर्ण असेतोवर केंद्र शासन तत्सम निदेश देणार नाही.

सांख्यिकी प्राधिकाऱ्याची नियुक्ती.

४. समुचित शासनाने जी कोणतीही आकडेवारी गोळा करण्यासाठी निदेश दिला असेल ती आकडेवारी गोळा करण्यासाठी त्याला 'सांख्यिकी प्राधिकारी' म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

**माहिती किंवा प्रतिवेदन मागवून घेण्याचा सांख्यिकी प्राधिकाऱ्याचा अधिकार.**

५. (१) सांख्यिकी प्राधिकारी ज्या बाबतीतील आकडेवारी गोळा करावयाची असेल अशा कोणत्याही बाबींसंबंधातील, विहित करण्यात येईल अशी माहिती किंवा प्रतिवेदने सादर करावयास फर्मावणारी नोटीस औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थेच्या मालकावर किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीवर बजावू शकेल किंवा बजावण्याची व्यवस्था करू शकेल.

(२) अशी माहिती किंवा प्रतिवेदने कोणत्या नमुन्यात आणि कोणत्या व्यक्तीला किंवा कोणत्या प्राधिकरणांना सादर करावीत, त्यांमध्ये कोणता तपशील अंतर्भूत असावा आणि अशी माहिती किंवा प्रतिवेदने किती कालांतरांच्या आत सादर करावीत या गोष्टी विहित करण्यात आल्याप्रमाणे असतील.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली नोटीस डाकेने बजावता येईल.

**अभिलेख किंवा दस्तऐवज पाहावयास मिळण्याचा हक्क.**

६. या अधिनियमाखाली कोणतीही आकडेवारी गोळा करण्यासाठी, सांख्यिकी प्राधिकाऱ्यास किंवा त्याने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमाखाली कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्यास फर्माविण्यात आलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातील कोणतेही संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज पाहता येतील आणि असे अभिलेख किंवा दस्तऐवज जेथे आहेत असा त्याचा समज असेल अशा कोणत्याही वास्तूत कोणत्याही योग्य वेळी प्रवेश करता येईल आणि संबंधित अभिलेख किंवा दस्तऐवज तपासता येतील किंवा त्यांच्या नकला करून घेता येतील किंवा या अधिनियमाखाली जी माहिती सादर करण्यास फर्माविण्यात आले असेल अशी कोणतीही माहिती मिळवण्यासाठी जरूर तो कोणताही प्रश्न विचारता येईल.

**माहिती व प्रतिवेदने प्रकाशित करण्यावरील निबंध.**

७. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही विवक्षित औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थेच्या बाबत दिलेली कोणतीही माहिती, कोणतेही स्वतंत्र प्रतिवेदन आणि स्वतंत्र प्रतिवेदनाचा कोणताही भाग हे, ज्यासंबंधात माहिती देण्यात किंवा प्रतिवेदन तयार करण्यात आले होते त्या औद्योगिक किंवा वाणिज्यिक संस्थेच्या तत्कालीन मालकाच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या लेखी पूर्वसंमतीवाचून, ज्यायोगे एखादा विशेष तपशील विशिष्ट संस्थेला अनुलक्षून आहे हे ओळखता येणे शक्य होईल अशा रीतीने प्रकाशित केला जाणार नाही.

(२) या अधिनियमाखालील किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील खटल्याची प्रयोजने खेरीजकरून एरव्ही, या अधिनियमाखाली आकडेवारी गोळा करण्यामध्ये जी व्यक्ती गुंतलेली नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेली कोणतीही माहिती किंवा स्वतंत्र प्रतिवेदन पाहण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

**दंड.**

८. जर कोणतीही व्यक्ती,—

(क) कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्यास तिला फर्माविण्यात आले असता—

(१) या अधिनियमाखाली आवश्यक असेल अशी माहिती किंवा प्रतिवेदन सादर करण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल किंवा त्या कामी कायदेशीर सबबीविना हयगय करील तर ; किंवा

(२) जी खोटी असल्याचे तिला माहीत असेल अशी कोणतीही माहिती किंवा प्रतिवेदन सादर करील किंवा सादर करवील तर ; किंवा

(३) या अधिनियमाखाली सादर करणे आवश्यक असलेली कोणतीही माहिती मिळवण्यासाठी जो कोणताही प्रश्न विचारणे जरुरीचे असेल त्याला उत्तर देण्यास नकार देईल किंवा बुद्धिपुरस्सर खोटे उत्तर देईल तर ; किंवा

(ख) संबद्ध अभिलेख किंवा दस्तऐवज पाहावयास मिळण्याचा जो हक्क किंवा प्रवेश करण्याचा जो हक्क कलम ६ ने प्रदान केलेला आहे त्याला प्रत्यवाय करील तर,

ती व्यक्ती अशा प्रत्येक अपराधाबद्दल पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि अपराध घडण्याचे चालू राहिल्यास, पहिल्या दिवसानंतर ज्या ज्या दिवशी अपराध घडण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसागणिक दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणखी द्रव्यदंडास पात्र होईल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

९. (१) कलम ८ खालील अपराधाबद्दल दोषी असलेली व्यक्ती जर कंपनी असेल तर, अपराध घडला त्यावेळी जी जी व्यक्ती कंपनीच्या कामकाज-चालनाची हुकूमदार असेल किंवा त्याबाबत कंपनीला जबाबदार असेल ती प्रत्येक व्यक्ती व त्याचप्रमाणे कंपनीही, अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल, आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास ते पात्र होतील :

परंतु आपणांस माहीत नसताना अपराध घडला किंवा अपराध घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती या अधिनियमाखाली कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल व कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मुकानुमतीने गुन्हा करण्यात आला आहे अथवा त्यांच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे हे शाबीत करण्यात आले असेल तर, असा

संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा देखील त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्नुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र होईल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क्) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे व त्यास पेढीचा किंवा अन्य व्यक्ति संघाचा अंतर्भाव आहे ; आणि

(ख्) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

माहिती किंवा प्रतिवेदने अनुचितपणे प्रकट करण्याबद्दल शिक्षा.

१०. जर या अधिनियमाखाली आकडेवारी गोळा करण्यासंबंधातील कामामध्ये गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा या अधिनियमाखाली दिलेली कोणतीही माहिती किंवा दिलेल्या कोणत्याही प्रतिवेदनातील मजकूर आपल्या कर्तव्यांची अंमलबजावणी करताना नव्हे तर एरव्ही अथवा या अधिनियमाखालील किंवा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याखालील अपराधाच्या पुरःसरणार्थ बुद्धिपुरस्सर प्रकट केला तर, ती अशा अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

अपराधाची दखल घेणे.

११. कलम ८ खालील अपराधाबद्दलचा कोणताही खटला सांख्यिकी प्राधिकाऱ्याखेरीज किंवा त्याच्या मंजुरीखेरीज कोणालाही गुदरता येणार नाही आणि कलम १० खालील अपराधाबद्दलचा कोणताही खटला समुचित शासनाखेरीज किंवा त्याच्या संमतीखेरीज कोणालाही गुदरता येणार नाही.

निदेश देण्याचा केंद्र शासनाचा अधिकार.

१२. या अधिनियमाची एखाद्या राज्यात अंमलबजावणी करण्यासंबंधी केंद्र शासन त्या राज्य शासनास निदेश देऊ शकेल.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

१३. या अधिनियमास किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांस किंवा त्याखाली दिलेल्या कोणत्याही निदेशांस अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल समुचित शासन, सांख्यिकी प्राधिकारी, अथवा समुचित शासनाच्या किंवा सांख्यिकी प्राधिकाऱ्याच्या प्राधिकारान्वये कार्य करणारी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१४. (१) समुचित शासनाला, या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करावयाचे झाल्यास, पूर्व प्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते करता येतील.

(२) पूर्वगामी अधिकाराच्या व्यापकतेस बाध न येता, या कलमाखाली पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील, त्या अशा :—

(क्) माहिती व प्रतिवेदने कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने सादर करता येतील, त्यांमध्ये कोणता विशेष तपशील अंतर्भूत असला पाहिजे, अशी माहिती व प्रतिवेदने किती कालांतरांच्या आत व कोणत्या प्राधिकाऱ्याकडे सादर करता येतील ;

(ख्) दस्तऐवज पाहावयास मिळण्याचा जो हक्क आणि प्रवेश करण्याचा जो हक्क कलम ६ द्वारे प्रदान करण्यात आलेला आहे तो कशा रीतीने वापरता येईल ; आणि

(ग्) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

[1][(३) केंद्र शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रुपातच, परिणाम होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

(४) राज्य शासनाने या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

१५. [निरसन.] निरसन व विशोधन अधिनियम, १९५७ (१९५७ चा ३६)—कलम २ व १ ली अनुसूची यांद्वारे निरसित (१७ सप्टेंबर, १९५७ रोजी व तेव्हापासून).

---

१. १९८६ चा अधिनियम क्रमांक ४ याचे कलम २ आणि अनुसूची यांद्वारे समाविष्ट केले (दिनांक ५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

रजिस्ट्री. सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

सं. 2] नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 [खण्ड 5
No. 2] NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 [Vol. 5
अंक २] नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ [खंड ५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसॅबिलिटीज रिमूवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# नाटयप्रयोग अधिनियम, १८७६

## (सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १९)[1]

(१५ डिसेंबर १९९३ रोजी यथाविद्यमान) [१६ डिसेंबर, १८७६]

**सार्वजनिक नाटयप्रयोगांचे अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रण करण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, अपप्रवादात्मक, बदनामीकारक, प्रजाक्षोभक किंवा अश्लील अशा सार्वजनिक नाटयप्रयोगांवर बंदी घालण्याची शक्ती शासनास प्रदान करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व विस्तार.**

१. या अधिनियमास, नाटयप्रयोग अधिनियम, १८७६, असे म्हणता येईल.

त्याचा विस्तार, [2][दिनांक १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी भाग ख राज्यांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली राज्यक्षेत्रे] वगळून संपूर्ण भारतभर आहे.

[3] * * * * * * *

**"दंडाधिकारी" याची व्याख्या.**

२. या अधिनियमात, "दंडाधिकारी" याचा अर्थ, इलाखा शहरांमध्ये पोलीस दंडाधिकारी, आणि इतरत्र जिल्हा दंडाधिकारी, असा आहे.

**विवक्षित नाटयप्रयोगांवर बंदी घालण्याची शक्ती.**

३. एखाद्या सार्वजनिक ठिकाणी करण्यात आलेले किंवा करण्यात यावयाचे कोणतेही नाटक, मूकनाटय किंवा अन्य नाटय हे,—

(क) अपप्रवादात्मक किंवा बदनामीकारक आहे, किंवा

(ख) [4][भारतात] कायद्याद्वारे स्थापन झालेल्या सरकारबद्दल अप्रीतीची भावना उत्पन्न होण्यास कारणीभूत होण्याची शक्यता आहे, किंवा

(ग) अशा प्रयोगाला उपस्थित असणाऱ्या व्यक्ती नीतिभ्रष्ट आणि भ्रष्टाचारी होण्यास कारणीभूत होण्याची शक्यता आहे,

असे राज्य शासनाचे जेव्हा जेव्हा मत होईल तेव्हा तेव्हा, राज्य शासन, किंवा इलाखा शहरांच्या [5] * * * बाहेर राज्य शासन किंवा त्याच्याकडून याबाबतीत ज्यास शक्ती प्रदान करण्यात येईल असा दंडाधिकारी हुकूमाद्वारे अशा प्रयोगास बंदी करू शकेल.

स्पष्टीकरण.—जेथे पैसे दिल्यानंतर लोकांना कार्यक्रम बघण्यासाठी प्रवेश देण्यात येतो अशी कोणतीही इमारत किंवा बंदिस्त जागा ही या कलमाच्या अर्थानुसार "सार्वजनिक ठिकाण" असल्याचे मानण्यात येईल.

**बंदीहुकूम बजावण्याची शक्ती; हुकूमाची अवज्ञा केल्याबद्दल शिक्षा.**

४. अशा कोणत्याही हुकूमाची प्रत, अशा बंदी घातलेल्या कार्यक्रमात भाग घेण्याच्या तयारीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर, किंवा जेथे असा कार्यक्रम करण्याचे योजलेले असेल अशा कोणत्याही घराच्या, खोलीच्या किंवा जागेच्या मालकावर किंवा ताबाधारकावर बजावण्यात येईल ; व ज्या व्यक्तीवर अशी प्रत बजावण्यात आलेली असून ही जी व्यक्ती अशा हुकूमाची अवज्ञा करून एखादे कृत्य करील किंवा ते केले जाण्यास राजीखुशीने मुभा देईल अशी कोणतीही व्यक्ती दंडाधिकाऱ्यासमोर तिची दोषसिद्धी झाल्यास, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

**हुकूम जाहीर रीत्या अधिसूचित करण्याची शक्ती.**

५. असा कोणताही हुकूम उद्घोषणेद्वारे अधिसूचित करण्यात येईल, व अशा बंदी घातलेल्या कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणाऱ्या किंवा कार्यक्रम पाहू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी त्या हुकूमाची माहिती देण्याच्या दृष्टीने अनुकूल करून घेतलेल्या कोणत्याही जागेत किंवा जागांमध्ये त्याची लेखी किंवा छापील नोटीस लावता येईल.

**बंदी हुकुमाची अवज्ञा करण्याबद्दल शिक्षा.**

६. असा कोणताही हुकूम जाहीर करण्यात आल्यानंतर, जो कोणीही,—

(क) त्याद्वारे बंदी घातलेल्या कार्यक्रमांत, किंवा जो कार्यक्रम सारतः अशा बंदी घातलेल्या कार्यक्रमासारखाच आहे अशा कोणत्याही कार्यक्रमात भाग घेईल, किंवा

(ख) असा कोणताही कार्यक्रम करण्यास कोणत्याही प्रकारे मदत करील, किंवा

(ग) अशा हुकूमाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा करून अशा कोणत्याही संपूर्ण कार्यक्रमास किंवा त्याच्या कोणत्याही भागाला प्रेक्षक म्हणून उपस्थित राहील, किंवा

---

१. हा अधिनियम मद्रासला प्रयुक्त असताना, तो १९५४ चा मद्रास अधिनियम ३३, याद्वारे निरसित करण्यात आला.

२. विधि अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६, द्वारे "भाग ख राज्ये" याऐवजी घातले.

३. १९१४ चा अधिनियम १०, कलम ३ आणि अनुसूची दोन, द्वारे "आणि तो तावडतोब अंमलात येईल" हे शब्द निरसित केले.

४. विधि अनुकूलन आदेश, १९४८, द्वारे "ब्रिटिश इन्डिया किंवा ब्रिटिश बर्मा" याऐवजी घातले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७, द्वारे "आणि रंगून" हे शब्द निरसित केले.

(घ) एखाद्या घराचा, खोलीचा किंवा जागेचा मालक किंवा ताबाधारक किंवा उपयोग करणारी व्यक्ती असून, अशा कोणत्याही कार्यक्रमासाठी ती जागा खुली करील, राखील किंवा वापरील अथवा अशा कोणत्याही कार्यक्रमासाठी ती खुली करण्यास, राखण्यास किंवा वापरण्यास मुभा देईल,

तो दंडाधिकाऱ्यासमोर त्याची दोष सिद्धी झाल्यास, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

माहिती मागवण्याची शक्ती.

७. कोणत्याही नियोजित सार्वजनिक नाटचप्रयोगाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी राज्य शासन किंवा ते यासंबंधात खास शक्ती प्रदान करील असा अधिकारी, ज्या नाटचाचा प्रयोग व्हावयाचा असेल त्याचा लेखक, मालक किंवा मुद्रक याच्याकडे, किंवा ज्या जागेत तो करण्याचे नियोजित केले आहे त्या जागेच्या मालकाकडे किंवा ताबाधारकांकडे, राज्य शासनाला किंवा अशा अधिकाऱ्याला आवश्यक वाटेल अशा माहितीची मागणी करू शकेल.

अशा तऱ्हेने जिच्याकडे मागणी करण्यात आली असेल अशी प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या यच्चयावत् कुवतीनुसार ती माहिती देण्यास बांधलेली असेल, व जो कोणीही या कलमाचे उल्लंघन करील त्याने भारतीय दंड संहिता, कलम १७६ खाली अपराध केला असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

प्रवेश करून अटक करण्यासाठी व अभिग्रहण करण्यासाठी पोलिसांना वॉरंट मंजूर करण्याची शक्ती.

८. या अधिनियमाखालील बंदी घातलेल्या कोणत्याही कार्यक्रमासाठी एखादे घर, खोली किंवा जागा वापरली जात आहे किंवा वापरली जाण्याच्या बेतात आहे असे कोणत्याही दंडाधिकाऱ्याला सकारण वाटले तर, तो आपल्या वॉरंटाद्वारे कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला आवश्यक त्या साहाय्यनिशी रात्री किंवा दिवसा व जरूर तर बळजबरीने अशा कोणत्याही घरात, खोलीत किंवा जागेत प्रवेश करून तेथे त्याला सापडतील त्या सर्व व्यक्ती ताब्यात घेण्यास व अशा प्रयोगासाठी वापरले असल्यांचा किंवा वापरण्याचे नियोजित असल्याचा ज्याविषयी वाजवी संशय आहे असे तेथे सापडतील ते देखावे, पोशाख व अन्य वस्तू सक्तीने ताब्यात घेण्यास प्राधिकृत करू शकेल.

दंड संहिता कलमे १२४क व २९४ यांखालील खटल्यांची व्यावृत्ती.

९. या अधिनियमाखाली कोणत्याही प्रकारे दोषसिद्धी झाल्यामुळे भारतीय दंड संहिता, कलम १२४क किंवा कलम २९४ या खाली खटला भरण्यास आडकाठी येणार नाही. १८६० चा ४५.

कोणत्याही स्थानिक क्षेत्रात लायसनाखेरीज नाटचप्रयोग करण्यास बंदी करण्याची शक्ती.

१०. या कलमाचे उपबंध एखाद्या स्थानिक क्षेत्रात लागू करणे आवश्यक आहे असे जेव्हा जेव्हा राज्य शासनाला वाटेल तेव्हा तेव्हा, ते [१]* * * शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे घोषित करून शकेल की, असे उपबंध अधिसूचनेत नियत केल्या जाणाऱ्या दिनांकापासून अशा क्षेत्राला लागू होतील.

त्या दिवशी व त्यानंतर, राज्य शासन असा आदेश देऊ शकेल की, अशा राज्य शासनाने किंवा ते या संबंधात खास करून ज्याला शक्ती प्रदान करील त्या अधिकाऱ्याने लायसन मंजूर केल्याखेरीज, अशा क्षेत्रात सार्वजनिक करमणुकीच्या कोणत्याही जागी कोणताही नाटचप्रयोग करता येणार नाही.

राज्य शासन असाही आदेश देऊ शकेल की, एखादा नाटचप्रयोग करावयाचा झाल्यास, ते नाटच लेखबद्ध असेल तर तेवढ्या मर्यादेपर्यंत त्याची एक प्रत किंवा ते मूकनाटच असेल तर तेवढ्या मर्यादेपर्यंत त्यांच्या आशयाचा पुरेसा वृत्तांत प्रयोगापूर्वी किमान तीन दिवस आधी राज्य शासनाला किंवा ते या संबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्याला सादर करण्यात आल्याशिवाय असा कोणताही नाटचप्रयोग अशा क्षेत्रात कोणत्याही सार्वजनिक करमणुकीच्या जागी होऊ शकणार नाही.

या कलमाखालील कोणत्याही आदेशाची प्रत सार्वजनिक करमणुकीच्या जागेच्या परिरक्षकावर बजावण्यात येऊ शकेल, व त्याने त्यानंतर अशा आदेशाची अवज्ञा करून कोणतेही कृत्य केले किंवा ते करण्यास स्वेच्छेने मुभा दिली तर, तो दंडाधिकाऱ्यासमोर त्याची दोषसिद्धी झाल्यास, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

११. [निरसित.]

धार्मिक उत्सवप्रसंगी होणारे कार्यक्रम वगळणे.

१२. कोणत्याही जत्रेच्या प्रसंगी किंवा धार्मिक उत्सवप्रसंगी होणारे तशा प्रकारचे कार्यक्रम यांना या अधिनियमातील काहीही लागू असणार नाही.

---

१. १९१४ चा अधिनियम ४, द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिल यांच्या मंजुरीने" हे शब्द निरसित केले.

रजिस्ट्री. सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2] | नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 | [खण्ड 5 |
| No. 2] | NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 | [Vol. 5 |
| अंक २] | नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ | [खंड ५ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसॅबिलिटीज रिमूवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# [1][तेलक्षेत्र] (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८

## (सन १९४८ चा अधिनियम क्रमांक ५३)

[दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ रोजी यथाविद्यमान]

[८ सप्टेंबर, १९४८.]

**[1]तेलक्षेत्रांचे विनियमन करण्यासाठी आणि खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा विकास करण्यासाठी उपबंध करण्यासाठी नियम.**

ज्याअर्थी, [2][लोकहिताच्या दृष्टीने] [2]* * * तेलक्षेत्रांचे विनियमन करण्यासाठी आणि [3][खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा] विकास करण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे ;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास [1]["तेलक्षेत्र] (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८" असे म्हणता येईल.

[5][(२) त्याचा विस्तार [6]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत नेमून देईल त्या दिनांकास[7] तो अंमलात येईल.

२. [केंद्र शासनाच्या नियंत्रणाच्या इष्टतेबाबतची घोषणा] खाण व खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याचे कलम ३२ व अनुसूची यांद्वारे निरसित (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

**व्याख्या.**

३. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काहीही नसेल तर, या अधिनियमात :—

(क) "पट्टाकार" आणि "पट्टेदार" या शब्दप्रयोगांमध्ये, अनुक्रमे, लायसनदाता आणि लायसनधारक यांचा समावेश होतो;

(ख) "खाण" या शब्दाचा अर्थ, [3][खनिज तेलाचा] शोध घेण्याच्या किंवा असे तेल मिळवण्याच्या प्रयोजनार्थ केलेले कोणतेही उत्खनन असा आहे, आणि त्या शब्दात तेलविहिरीचा समावेश होतो;

(ग) [3]["खनिज तेले"] या शब्दप्रयोगात नैसर्गिक वायू व पेट्रोलियम यांचा समावेश होतो;

(घ) "खाणकाम पट्टा" या शब्दप्रयोगाचा अर्थ, [3][खनिज तेलांचा] शोध घेण्यासाठी, ती नमुन्यादाखल निष्कर्षिण्यासाठी त्याकरिता व्यापक प्रमाणावर खाणकाम करण्यासाठी, ती प्राप्त करण्यासाठी, त्यांना विक्रययोग्य बनवण्यासाठी, त्यांची ने-आण करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी किंवा त्या गोष्टींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी दिलेला पट्टा असा आहे, आणि त्या शब्दप्रयोगात, समन्वेषण लायसन किंवा पूर्वेक्षण लायसन याचा समावेश होतो;

(ङ) "तेलक्षेत्र" या शब्दाचा अर्थ, ज्या क्षेत्रात नैसर्गिक वायू व पेट्रोलियम, अशोधित तेल (क्रूड ऑईल), परिष्कृत तेल, अंशतः परिष्कृत केलेले तेल आणि पेट्रोलियमजन्य पदार्थांपैकी कोणतेही द्रव किंवा घन स्थितीतील पदार्थ मिळवण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही कामे चालवावयाची आहेत किंवा चालवण्यात येत आहेत असे कोणतेही क्षेत्र असा आहे.

---

१. १९५७ चा अधिनियम ६७ याचे कलम ३२ व तिसरी अनुसूची यांद्वारे "खाण व खनिज" याऐवजी घातले (दिनांक १ जून, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाद्वारे "खाण व" हे शब्द वगळण्यात आले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाद्वारे "खनिज" या ऐवजी घातले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाद्वारे "यात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत" हा मजकूर वगळण्यात आला (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

५. विधि अनुकूलन आदेश १९५० द्वारे पूर्वीच्या पोटकलमाऐवजी घातले.

६. १९५७ चा अधिनियम ६७ याचे कलम ३२ व तिसरी अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य वगळता" हा मजकूर वगळण्यात आला (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

७. २५ ऑक्टोबर १९४९, अधिसूचना क्रमांक एम. दोन १५५(२४)-एक, दिनांक ८ ऑक्टोबर, १९४९ (भारताचे राजपत्र, असाधारण, १९४९ पृष्ठ २०७५).

**कोणताही खाणकाम पट्टा या अधिनियमास अनुसरून असल्याखेरीज तो विधिग्राह्य नाही.**

४. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर या अधिनियमाखाली केलेल्या नियमांस अनुसरून असल्याखेरीज अन्यथा कोणताही खाणकाम पट्टा देता येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांविरुद्ध दिलेला कोणताही खाणकाम पट्टा शून्य व प्रभावहीन ठरेल.

**खाणकाम पट्ट्यांच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.**

५. (१) केंद्र सरकार खाणकाम पट्टे देण्याचे विनियमन करण्यासाठी किंवा कोणत्याही [१][खनिज तेलाच्या] संबंधात किंवा कोणत्याही क्षेत्रांत असे पट्टे देण्यास प्रतिबंध करण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [२][नियम] करू शकेल.

(२) विशेषतः आणि वरील शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील :—

(क) कशा रीतीने, कोणत्या [१][खनिज तेलांच्या] किंवा क्षेत्रांच्या बाबतीत आणि कोणत्या व्यक्तींना खाणकाम पट्ट्यांसाठी अर्ज करता येईल ते, आणि अशा अर्जासोबत द्यावयाची फी;

(ख) कोणत्या प्राधिकरणास, कोणत्या अटींवर आणि कोणत्या शर्तींच्या अधीनतेने असे खाणकाम पट्टे देता येतील;

(ग) किती कमाल किंवा किमान क्षेत्रासाठी आणि किती मुदतीसाठी कोणताही खाणकाम पट्टा देता येईल, आणि कोणत्या अटींवर सलग क्षेत्रांच्या संबंधातील पट्ट्यांचे एकत्रीकरण करता येईल;

(घ) पट्टेदाराने द्यावयाचे कमाल व किमान भाडे निश्चित करणे—मग तेथे खाणकाम चालू असो वा नसो.

**खनिज तेलाचा विकास करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.**

६. (१) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, [१][खनिज तेलांचे] संरक्षण व विकास करण्यासाठी नियम करू शकेल.

(२) विशेषतः, आणि वरील शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता, पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसाठी असे नियम करता येतील :—

[३](क) * * * * * *

(ख) * * * * * *

(ग) कोणतीही इंजिने, यंत्रसामग्री किंवा इतर साधनसामग्री यांचा वापर विहित करून किंवा तो विनियमित करून कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही [४][खनिज तेलाच्या साधनसंपत्तीचा] विकास करणे;

(घ) एखाद्या तेलक्षेत्रात तेल विहिरींचे विंधण करणे, पुन्हा विंधण करणे, त्या खोल करणे, बंद करणे, त्यांना प्लग करणे आणि त्या सोडून देणे या गोष्टी विनियमित करणे आणि अशा कामांवर मर्यादा घालणे किंवा त्यास प्रतिबंध करणे आणि तेल वाया जाऊ नये किंवा त्यास नुकसान पोहचू नये म्हणून सुधारात्मक उपाययोजना हाती घेणे;

(ङ) कोणत्याही तेलक्षेत्रात तेलाचे उत्पादन करण्याच्या पद्धतींचे विनियमन करणे, आणि अशा पद्धतींवर मर्यादा घालणे किंवा त्यांना प्रतिबंध करणे;

(च) सर्व नवीन विंधणकामे (बोअरिंग्ज) आणि कूपकांची खोदकामे (शॅफ्ट सिंकिंग्ज) सक्तीने अधिसूचित करणे, आणि विंधणकामाचे कागदपत्र व सर्व नवीन विंधणविवरांच्या क्रोड-भागांचे (कोअर्स) नमुने जतन करून ठेवणे;

(छ) खाणी आणि नवीन विंधणविवरे यांतून नमुने घेणे ;

(ज) [१][खनिज तेले] साठवून ठेवण्याकरिता करावयाच्या व्यवस्थेचे आणि कोणत्याही व्यक्तीस अशा तेलांचा किती साठा ठेवता येईल त्याबाबत विनियमन करणे ;

---

१. १९५७ चा अधिनियम ६७ याच्या कलम ३२ व ३ री अनुसूची याद्वारे "खनिज" याऐवजी घातले (दिनांक १ जून, १९५८ रोजी व तेव्हापासून).

२. खनिज सवलत नियम, १९४९ साठी भारताचे राजपत्र, १९४९, भाग एक पृष्ठ २०७५ आणि पेट्रोलियम सवलत नियम, १९४९, साठी उपरोक्त असाधारण राजपत्र, पृष्ठ २७१३ पहा.

३. १९५७ चा अधिनियम ६७ याच्या कलम ३२ व ३ री अनुसूची यांद्वारे "खंड (क) व (ख)" वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३२ व ३ री अनुसूची यांद्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (दिनांक १ जून १९५८ रोजी व तेव्हापासून).

[1][ (झ) खाणीतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, उत्खनन करून मिळवलेल्या, किंवा संग्रह केलेल्या खनिज तेलांच्या बाबतीत स्वामित्वधन वसूल करणे, आणि त्यावर फी किंवा कर आकारणे व ते वसूल करणे ; ]

(ञ) खाणींच्या मालकांनी किंवा पट्टेदारांनी विशेष किंवा नियतकालिक प्रतिवेदने व अहवाल सादर करणे, आणि अशी प्रतिवेदने व अहवाल कोणत्या नमुन्यात व कोणत्या प्राधिकरणाकडे सादर केले पाहिजेत ते.

**खनिज तेलांच्या बाबतीतील स्वामित्वधन.**

[2][ ६क. (१) "तेलक्षेत्र (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९६९" याच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, अशा खाणकाम पट्टयाच्या संलेखामध्ये किंवा अशा प्रारंभाच्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा प्रारंभानंतर तिने पट्टयाच्या क्षेत्रातील खाणींतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, अशा क्षेत्रात उत्खनन करून मिळवलेल्या किंवा संग्रह केलेल्या कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत, त्या खनिज तेलासंबंधी अनुसूचीत त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल.

(२) "तेलक्षेत्र (विनियमन व विकास) विशोधन अधिनियम, १९६९" याच्या प्रारंभास किंवा त्यानंतर देण्यात आलेला खाणकाम पट्टा धारण करणारी व्यक्ती, तिने पट्टयाच्या क्षेत्रातील खाणीतून काढलेल्या, दगडखाणीतून काढलेल्या, अशा क्षेत्रात उत्खनन करून मिळवलेल्या किंवा संग्रह केलेल्या कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत, त्या खनिज तेलासंबंधी अनुसूचीत त्या त्या वेळी जो दर विनिर्दिष्ट केला असेल त्या दराने स्वामित्वधन देईल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, अपरिहार्यपणे वाया जाणाऱ्या किंवा टाकीत परत पाठवण्यात येणाऱ्या किंवा पेट्रोलियम किंवा नैसर्गिक वायू यांचे किंवा या दोन्हींचे उत्पादन करताना विंधणकाम किंवा अन्य काम करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अशोधित तेलाच्या, केसिंग शीर्ष द्रवणाच्या (केसिंगहेड कन्डेन्सेट) किंवा नैसर्गिक वायूच्या संबंधात कोणतेही स्वामित्वधन देय होणार नाही.

(४) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीत ज्या दराने स्वामित्वधन प्रदेय असेल तो दर वाढवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी, केंद्र सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत नमूद करण्यात येईल त्या दिनांकास व तेव्हापासून अनुसूचीत विशोधन करता येईल :

परंतु, केंद्र सरकारास,—

(क) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीतील स्वामित्वधनाचा दर तेलक्षेत्रामध्ये किंवा प्रकरणपरत्वे, तेलविहीरीच्या ठिकाणी त्या खनिज तेलाची जी विक्रीची किंमत असेल त्या किंमतीच्या वीस टक्क्यांहून अधिक होईल अशा रीतीने निश्चित करता येणार नाही ; किंवा

(ख) कोणत्याही खनिज तेलाच्या बाबतीतील स्वामित्वधनाचा दर [3][तीन] वर्षांच्या कोणत्याही कालावधीमध्ये एकापेक्षा अधिक वेळा वाढवता येणार नाही.]

**विद्यमान पट्टयामध्ये फेरबदल करण्यासाठी नियम करण्याची शक्ती.**

७. (१) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी देण्यात आलेला कोणताही खाणकाम पट्टा कलमे ५ व ६ अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधांशी अनुरूप करून घेण्याच्या दृष्टीने त्या पट्टयाच्या अटी व शर्ती यांमध्ये फेरफार किंवा बदल करण्यासाठी केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करू शकेल;

परंतु, अशा रीतीने केलेल्या ज्या कोणत्याही नियमांमध्ये पोटकलम (२) खंड (ग) यात नमूद केलेल्या बाबींसाठी तरतूद करण्यात आली असेल, अशा कोणत्याही नियमांना फेरबदलांनिशी किंवा फेरबदलांवाचून [4][लोकसभेची] मान्यता मिळेपर्यंत ते अंमलात येणार नाहीत.

(२) पोटकलम (१) अन्वये केलेल्या नियमांत पुढील बाबींसाठी तरतूद करण्यात येईल :—

(क) अशा नियमांन्वये करावयाच्या नियोजित फेरफारांची किंवा बदलांची पट्टेदारास आणि पट्टाकार म्हणजे केंद्र सरकार नसेल त्या बाबतीत, पट्टाकारासदेखील आगाऊ नोटीस देऊन त्यांना अशा प्रस्तावाविरुद्ध कारण दाखवण्याची संधी देणे;

(ख) नियोजित फेरफारांमुळे किंवा बदलांमुळे ज्या पक्षकाराचा लाभ होत असेल त्या पक्षकाराने, अशा फेरफारांमुळे किंवा बदलांमुळे ज्या पक्षकाराच्या विद्यमान पट्टयाखाली असलेल्या हक्कांवर प्रतिकूल परिणाम होईल त्या पक्षकारास भरपाई देणे; आणि

(ग) उक्त भरपाई कोणत्या तत्त्वावर, अशा रीतीने आणि कोणत्या प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल ते.

---

१. १९६९ चा अधिनियम ३९ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाद्वारे समाविष्ट केले.

३. १९८४ चा अधिनियम २०, कलम २ द्वारे 'चार' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे ऐवजी घातले.

[1][अनुसूची

(कलम ६ क पहा)

स्वामित्वधनाचा दर

| | |
|---|---|
| (१) अशोधित तेल .. | .. प्रत्येक मेट्रिक टनामागे [2][बेचाळीस रुपये. |
| (२) केसिंग शीर्ष द्रवण (केसिंग हेड कन्डेन्सेट) .. | प्रत्येक मेट्रिक टनामागे [2][बेचाळीस रुपये] |
| (३) नैसर्गिक वायू .. | .. विहिरीच्या ठिकाणी नैसर्गिक वायूचे जे मूल्य असेल त्याच्या दहा टक्के.] |

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "केंद्रीय विधान मंडळ" याऐवजी घातले.

२. १९८४ चा अधिनियम, २० याच्या कलम ३ द्वारे ऐवजी घातले.

रजिस्ट्री. सं. डी–221

Price : Rs. 5.00
REGISTERED No. D-221
नोंदणी क्रमांक डी-221

# भारत का राजपत्र
# The Gazette of India
# भारताचे राजपत्र

असाधारण
EXTRAORDINARY
असाधारण

भाग 12 अनुभाग 1
Part XII Section 1
भाग बारा अनुभाग १

प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY
प्राधिकाराद्वारे प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| सं. 2] | नई दिल्ली, 30 जून 1994/9 आषाढ (शक) 1916 | [खण्ड 5 |
| No. 2] | NEW DELHI, 30th JUNE 1994/9 ASHADHA (SAKA) 1916 | [Vol. 5 |
| अंक २] | नवी दिल्ली, ३० जून, १९९४/९ आषाढ (शके) १९१६ | [खंड ५ |

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## विधि और न्याय मंत्रालय

(विधायी विभाग)

नई दिल्ली, दिनांक 30 जून आषाढ 1994/9 आषाढ (शक) 1916

(1) दि ऑफिसिएल सिक्रेट ऍक्ट, 1923, (2) दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ऍक्ट, 1860, (3) दि कास्ट डिसॅबिलिटीज रिमुवल ऍक्ट, 1850, (4) दि कलेक्शन ऑफ स्टॅटीस्टीक्स ऍक्ट, 1953, (5) दि ड्रॅमॅटिक परफॉर्मन्सेस ऍक्ट, 1876, (6) दि ऑईल फिल्ड्स (रेग्युलेशन अॅन्ड डेव्हलपमेंट) ऍक्ट, 1948, (7) दि टर्मिनल टॅक्स ऑन रेल्वे पॅसेंजर्स ऍक्ट, 1956 के मराठी अनुवाद राष्ट्रपति के प्राधिकार से प्रकाशित किये जाते हैं और प्राधिकृत पाठ (केंद्रिय विधि) अधिनियम, 1973 (1973 का 50) की धारा 2 के खंड (क) के अधीन ये मराठी भाषा में उनके प्राधिकृत पाठ समझे जाएंगे।

## MINISTRY OF LAW AND JUSTICE

(LEGISLATIVE DEPARTMENT)

New Delhi, dated 30th June 1994/9 Asadha (Saka) 1916

The Translations in Marathi of (1) The Official Secrets Act, 1923, (2) The Societies Registration Act, 1860, (3) The Caste Disabilities Removal Act, 1850, (4) The Collection of Statistics Act, 1953, (5) The Dramatic Performances Act, 1876, (6) The Oilfields (Regulation and Development) Act, 1948, (7) The Terminal Tax on Railway Passengers Act, 1956 are hereby published under the authority of the President and shall be deemed to be the authoritative texts thereof in Marathi under clause (*a*) of section 2 of the Authoritative Texts (Central Laws), Act, 1973 (50 of 1973).

# रेल्वे प्रवासी सीमा कर अधिनियम, १९५६

## (सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ६९)

[दिनांक १ जून १९९३ रोजी यथाविद्यमान]

[१२ डिसेंबर १९५६]

**तीर्थक्षेत्रांच्या किंवा जेथे जत्रा, मेळे किंवा प्रदर्शने भरविण्यात येतात अशा विवक्षित ठिकाणांपासून किंवा अशा ठिकाणी रेल्वेने ने-आण केल्या जाणाऱ्या प्रवाशांवर सीमा कर आकारण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'रेल्वे प्रवासी सीमा कर अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) तो, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील *अशा दिनांकास अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "कमाल दर" याचा अर्थ अनुसूचित विनिर्दिष्ट केलेले सीमा कराचे दर, असा आहे;

(ख) "मेळा" याचा अर्थ, कोणत्याही धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी जमणाऱ्या लोकांचा मेळावा, असा आहे ;

(ग) "अधिसूचित ठिकाण" याचा अर्थ तीर्थक्षेत्राचे किंवा जेथे जत्रा, मेळा किंवा प्रदर्शन भरवण्यात आले आहे किंवा भरवण्यात येण्याची शक्यता आहे असे जे ठिकाण केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अनुसूचित ठिकाण असल्याचे घोषित केले असेल ते ठिकाण, असा आहे;

१८९० चा ९. (घ) "रेल्वे प्रशासन" याला 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' यात नमूद देण्यात आलेला अर्थ आहे.

**अधिसूचित ठिकाणांपासून किंवा अधिसूचित ठिकाणी रेल्वेने ने-आण केल्या जाणाऱ्या प्रवाशांवर सीमा कर.**

३. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधाच्या अधीनतेने, कोणत्याही अधिसूचित ठिकाणापासून किंवा कोणत्याही अधिसूचित ठिकाणी रेल्वेने ने-आण केल्या जाणाऱ्या सर्व प्रवाशांवर प्रत्येक रेल्वे तिकिटामागे (मग ते एकेरी असो वा परतीचे असो) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशा कमाल दरांहून जास्त नसलेल्या दरांनी सीमा कर आकारला जाईल; आणि अशा अधिसूचनेत कोणत्या दिनांकी व दिनांकापासून सीमा कर आकारला जाणार ते विनिर्दिष्ट करण्यात येईल व किती कालावधीकरिता तो आकारण्यात येईल तेही विनिर्दिष्ट करता येईल :

परंतु, अधिसूचनेत असा कोणताही कालावधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तर, हा अधिनियम अंमलात असेतोपर्यंत सीमा कर आकारण्यात येईल :

(२) कमाल दरांच्या अधीनतेने,—

(क) निरनिराळ्या अधिसूचित ठिकाणांच्या संबंधात; आणि

(ख) कमी अंतराचे प्रवासी व दूर अंतराचे प्रवासी यांच्या संबंधात सीमा कराचे निरनिराळे दर निश्चित करता येईल; परंतु, कमी अंतराच्या प्रवाशांबाबतचा दर जास्त अंतराच्या प्रवाशांबाबतच्या दराहून नेहमी कमी असेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमात, कोणत्याही अधिसूचित ठिकाणापासून एकशेपन्नास मैलांपेक्षा जास्त नाही इतक्या अंतरावरील ठिकाणाकडे रेल्वेने जाणारा किंवा कोणत्याही अधिसूचित ठिकाणाकडे एकशेपन्नास मैलांपेक्षा जास्त नाही इतक्या अंतरावरील ठिकाणापासून रेल्वेने जाणारा प्रवासी हा कमी अंतराचा प्रवासी असल्याचे मानले जाईल; आणि अन्य कोणताही रेल्वे प्रवासी हा दूर अंतराचा प्रवासी असल्याचे मानण्यात येईल.

---

* दिनांक १ एप्रिल १९५७, पहा—अधिसूचना क्र.एस.आर.ओ.८६७, दिनांक ८ मार्च १९५७. **भारताचे राजपत्र** १९५७, इंग्रजी, भाग दुसरा, विभाग ३, पृ. ४९२.

विवक्षित सीमांमध्ये सीमा कर आकारावयाचा नाही.

४. कोणत्याही अधिसूचित ठिकाणापासून चाळीस मैलांच्या त्रिज्येच्या आत अथवा त्याहून कमी असे जे अंतर केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील तितक्या अंतराच्या आत असलेल्या कोणत्याही रेल्वे स्थानकाकडे त्या अधिसूचित ठिकाणाकडून रेल्वेने किंवा अशा रेल्वेस्थानकाकडून त्या ठिकाणाकडे रेल्वेने जाणाऱ्या कोणत्याही प्रवाशांवर कोणताही सीमा कर आकारला जाणार नाही.

कराचा दर बदलण्याची केंद्र शासनाची शक्ती.

५. कलम ३ अन्वये कोणत्याही अधिसूचित ठिकाणाच्या संबंधात आकारलेल्या सीमा कराचे दर केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे सरसकट सर्व रेल्वे प्रवाशांच्या बाबतीत किंवा रेल्वे प्रवाशांपैकी एखाद्या वर्गाच्या रेल्वे प्रवाशांच्या बाबतीत वेळोवेळी बदलता येतील.

आकारणी बंद करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

६. केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, कोणत्याही अधिसूचित ठिकाणाच्या संबंधात आकारण्यात आलेला सीमा कर अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या कारणास्तव अधिसूचनेत विनिर्दिष्ट असेल अशा दिनांकास व तेव्हापासून त्याठिकाणच्या संबंधात आकारण्याचे बंद करण्यात येईल.

करवसुलीची पद्धत.

७. (१) या अधिनियमान्वये आकारण्यात आलेला सीमा कर हा, प्रवास भाड्यांवरील अधिभाराच्या रूपाने रेल्वे प्रशासन वसूल करील; आणि जेथे तो अशा रीतीने वसूल करण्यात येईल तेथे, जणू असा कर हा, 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' या अन्वये रेल्वे प्रशासनास ज्याची वसुली करण्याचा अधिकार प्रदान झालेला आहे अशी पट्टी किंवा प्रवासभाडे आहे असे समजून त्याप्रमाणे त्याची वसुली करण्याचे सर्व अधिकार रेल्वे प्रशासनाला असतील व त्या बाबतीत सर्व उपाय त्यास उपलब्ध असतील. १८९० चा ९.

(२) कोणत्याही अधिसूचित ठिकाणाच्या संबंधातील करापासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नापकी केंद्र शासन वेळोवेळी विनिश्चित करील असा भाग कराच्या वसुलीचा खर्च भागवण्यासाठी वजा करण्यात येईल.

या अधिनियमाखाली सीमा कर आकारण्यात आला असेल तेव्हा, रेल्वे प्रवाशांवर अन्य कोणताही सीमा कर आकारावयाचा नाही.

८. रेल्वेने ने-आण करण्यात येणाऱ्या प्रवाशांवर या अधिनियमान्वये कोणत्याही अधिसूचित ठिकाणच्या संबंधात सीमा कर आकारण्यात आला असेल तर त्याबाबतीत, कोणत्याही कायद्यामध्ये काहीही असले तरी, अशा ठिकाणच्या संबंधात अशा प्रवाशांवर अन्य कोणत्याही कायद्याखाली अन्य कोणताही सीमा कर आकारला जाणार नाही.

सूट.

९. या अधिनियमात किंवा अन्य कोणत्याही कायद्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, रेल्वेने ने-आण करण्यात येणाऱ्या प्रवाशांपैकी पुढील प्रकारच्या प्रवाशांवर सीमा कराची आकारणी प्राधिकृत होते असे मानले जाणार नाही, ते असे :—

(क) तीन वर्षांहून अधिक वय नसलेली मुले;

(ख) रेल्वे अधिपत्रावर प्रवास करणारे पोलीस अधिकारी;

(ग) सैनिकी अधिपत्रांवर प्रवास करणाऱ्या व्यक्ती आणि वाहनवार दराने राखीव वाहनांतून प्रवास करणाऱ्या सेना; आणि

(घ) मोफत पासांचे धारक.

## अनुसूची

### सीमा कराचे कमाल दर

[कलम २ (क) पहा]

| जागेचा वर्ग | सीमा कराचे कमाल दर (क) (प्रत्येक एकेरी तिकिटाच्या बाबतीत) | | | (ख) (प्रत्येक परती तिकिटाच्या बाबतीत) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. |
| वातानुकूलित किंवा पहिला वर्ग .. | १ | ८ | ० | ३ | ० | ० |
| दुसरा वर्ग .. .. | १ | ० | ० | २ | ० | ० |
| तिसरा वर्ग .. .. | ० | ८ | ० | १ | ० | ० |

के. एल. मोहनपुरिया,
सचिव, भारत सरकार.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई